Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 01 December 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०१ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज ओडिशातील पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषेदचा समारोप
- महायुती सरकारचा शपथविधी पाच डिसेंबरला पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणार
- राज्य विधानसभा निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, काँग्रेसनं उपस्थित केलेल्या प्रश्नांवर चर्चेची निवडणूक आयोगाची तयारी
- पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन, सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

  आणि

- राज्यात थंडीची लाट आणखी दोन दिवस राहणार असल्याची हवामान विभागाची माहिती

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज ओडिशाच्या भुवनेश्वर इथं पोलिस महासंचालक आणि पोलिस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेचा समारोप होत

आहे. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलिस महासंचालक, तसंच केंद्रीय राखीव पोलिस बल, रॉ, राष्ट्रीय सुरक्षा दल – एनएसजी, गुप्तचर विभाग आणि विशेष सुरक्षा दल – एसपीजीचे प्रमुख या परिषदेला उपस्थित आहेत. या परिषदेत अंतर्गत सुरक्षा, सायबर क्राईम, नक्षलवाद, कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांमुळे निर्माण होणारी आव्हानं, ड्रोनचे नवीन धोके आणि दहशतवादाचा सामना यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. या परिषदेत विशिष्ट सेवेसाठीची राष्ट्रपती पोलिस पदकंही प्रदान करण्यात येणार आहेत.

****

राज्यात नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी येत्या पाच डिसेंबरला होणार आहे. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल ट्विट करून ही माहिती दिली. पाच डिसेंबरला मुंबईत आझाद मैदानावर सायंकाळी पाच वाजता नव्या सरकारचा शपथविधी होणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी या सोहळ्याला उपस्थित राहणार असल्याचं, बावनकुळे यांनी सांगितलं आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक होती, तरीही काँग्रेस पक्षाने याबाबत उपस्थित केलेल्या वाजवी मुद्यांवर परवा तीन डिसेंबरला चर्चेला येण्याचं आमंत्रण केंद्रीय निवडणूक आयोगानं काँग्रेसला दिलं आहे. निवडणूक आयोगाच्या यंत्रणेबाबत शंका उपस्थित करणारं पत्र काँग्रेसने निवडणूक आयोगाला लिहिलं होतं. त्यावर दिलेल्या अंतरिम उत्तरात आयोगानं, मतदानाच्या टक्केवारीत काहीही विसंगती नसल्याचं स्पष्ट करत, संबंधित माहिती मतदान केंद्रांच्या तपशिलासह सर्व उमेदवारांना उपलब्ध होती आणि ती पडताळून पाहणंही शक्य होतं, असं नमूद केलं. मतदानाच्या आकडेवारीबाबत खुलासेवार प्रसिद्धीपत्रकही जारी करण्यात आलेलं आहे, असंही आयोगानं म्हटलं आहे.

****

देशात संसदीय लोकशाहीचं पालन नीट होत नसल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. ते काल पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. निवडणुकीच्या निकालानंतर लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता पसरली असून देशात हे प्रथमच घडत असल्याचं पवार म्हणाले. मतदान यंत्राबद्दल काही शंका आहेत, मात्र याबद्दल ठोस पुरावा नाही. काही जणांनी पुनर्मोजणीची मागणी केली आहे, मात्र यातून काही निष्पन्न होईल, अशी आशा नसल्याचं, पवार यांनी सांगितलं.

****

नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार ऋषीकेश उर्फ बंटी शेळके यांना प्रदेश काँग्रेसकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर केलेल्या खोट्या आरोपांबाबत आपल्याला निलंबित का करू नये, असं यात म्हटलं असून, यासंदर्भात २ दिवसांत खुलासा करण्याचे निर्देश शेळके यांना देण्यात आले आहेत. दोन दिवसांत उत्तर न दिल्यास, याबाबत आपलं काहीही म्हणणं नाही, असं समजून थेट कारवाई करण्यात येईल, असं याबाबतच्या पत्रात म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयशाने खचून जाऊ नये, उलट दुप्पट शक्तीने मोठी ताकद उभी करण्याचं आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आपल्या पक्ष पदाधिकाऱ्यांना केलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं, जिल्ह्यातल्या विविध विधानसभा मतदार संघातल्या पक्ष पदाधिकाऱ्यांशी बोलत होते. संघटनात्मकरित्या मोठी ताकद उभी करुन पक्षाला पुन्हा सत्तेत आणल्याशिवाय स्वस्थ बसू नका  असं दानवे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितलं.

****

सर्पदंशाची प्रकरणं अधिसूचित रोगांच्या श्रेणीत समाविष्ट करण्याची सूचना केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी काल सर्व राज्यं आणि

केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिव तसंच अतिरिक्त मुख्य सचिवांना पत्र लिहिलं असून, त्यात ही सूचना केली आहे. सर्पदंश हा गंभीर विषय असून, २०३० पर्यंत सर्पदंशामुळे होणाऱ्या मृत्यूंचं प्रमाण निम्म्यावर आणण्याचं उद्दीष्ट निर्धारित केल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महिला आणि बालविकास विभागाच्या वतीनं नोव्हेंबर महिना हा आंतरराष्ट्रीय दत्तक महिना म्हणून पाळण्यात येतो. या दत्तक महिन्यानिमित्त हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी, आखाडा बाळापूर इथलं पोलिस ठाणं, बसस्थानक, उपजिल्हा रुग्णालय आदी ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी मुल दत्तक घेण्यास इच्छुक असलेल्या पालकांना कायदेशीर दत्तक प्रक्रियेसंदर्भात माहिती देण्यात आली. दरम्यान, सोडून दिलेल्या, अनाथ बालकांसंदर्भात माहिती मिळाल्यास तात्काळ जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी कार्यालय हिंगोली यांना संपर्क करावा, असं आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी केलं आहे.

****

स्वामिनाथन् आयोगानुसार शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा भाव ठरवला गेला पाहिजे, अशी मागणी नर्मदा बचाव आंदोलन कार्यकर्त्या आणि जन आंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयक मेधा पाटकर यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी भवनात शेतकरी कष्टकरी कार्यकर्त्यांबरोबर पाटकर यांनी काल संवाद साधला, त्यावेळी त्यांनी ही मागणी केली. शेतकरी कुटुंबाच्या श्रमांची दखल, या शेत मालाच्या भावामध्ये धरली जावी, श्रमाचं मूल्य , श्रमाची प्रतिष्ठा जोपासली जावी असं या म्हणाल्या. श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कायद्याचा अभ्यास करण्याची गरजही पाटकर यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ कार्यकर्ते डॉक्टर बाबा आढाव यांच आत्मक्लेष उपोषणाच्या समर्थनार्थ काल छत्रपती संभाजीनगर इथं श्रमजीवी संघटनेच्या वतीने एक दिवसीय उपोषण करण्यात आलं.

बाबा आढाव यांनी काल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पाणी पिऊन या उपोषण आंदोलनाची सांगता केली.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही काल आढाव यांची उपोषणस्थळी भेट घेतली. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांचा पराभव झाला, मात्र त्यावेळी कुणीही मतदान यंत्रावर शंका घेतली नाही, असं सांगत विरोधकांनी केलेले सर्व आरोप पवार यांनी फेटाळून लावले.

****

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीत अव्वल मानांकित पी.व्ही सिंधूनं काल अंतिम फेरीत प्रवेश केला. उपान्त्य फेरीत तिनं उन्नती हुडा हिला अवघ्या ३५ मिनिटांत २१– १२, २१ – ०९ असं पराभूत केलं. अंतिम फेरीत सिंधुची लढत थायलँडच्या वू लुओ यू हिच्याशी होणार आहे.

ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यांनी थायलँडच्या बेनियपा एमसार्ड आणि नुन्ताकाम एमसार्ड या जोडीला नमवलं.

पुरुष गटाच्या उपान्त्य फेरीत लक्ष्य सेन ने जपानच्या शोगो ओगावा याचा २१ –८ आणि २१ – १४ अशा गुणफरकाने पराभव केला. अंतिम फेरीत आता त्याचा सामना सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेह याच्याशी होणार आहे. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रेस्टो यांनी चीनच्या झोऊ झी होंग आणि यांग जिया यी जोडीवर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

****

राज्यात थंडीची तीव्र लाट पसरली असून, पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक गारवा जाणवत आहे. येत्या दोन दिवसांत काही जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट

येईल, असा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. विदर्भातही पारा घसरला असून, अमरावती जिल्ह्यात काल सकाळी बारा अंश सेल्सिअस, धारणी–चिखलदरा इथं नऊ अंश सेल्सिअस तर नाशिक जिल्ह्याच्या निफाड तालुक्यात काल सकाळी सात अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली,

****

५३ वी आंतरजिल्हा आणि ८६ वी राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा दोन ते सहा डिसेंबर दरम्यान पुण्यात होणार आहे. या स्पर्धेत २५ जिल्ह्यांमधील एक हजारांहून अधिक खेळाडू सहभागी होत आहेत.

****

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीनं दिल्ली इथं होणाऱ्या ९८ वाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला जाण्यासाठी केंद्र सरकारनं पुण्याहून विशेष रेल्वेची व्यवस्था केली आहे. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी याबाबत माहिती दिली. त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले. २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी हे साहित्य संमेलन होणार आहे.

****

नैऋत्य बंगालच्या उपसागरात तयार झालेलं फेंगल चक्रीवादळ पुद्दुचेरीजवळच्या कराईकल आणि महाबलीपुरम्च्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. खबरदारीचा उपाय म्हणून किनारपट्टी आणि सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. चेन्नईत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे विमान उड्डाणांवर परिणाम झाला आहे. वादळी वारे आणि पावसाचं पाणी साचल्याने अनेक विमानांचं उड्डाण रद्द करण्यात आलं आहे.

****

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या कामाला गती आली आहे. या मार्गापैकी धाराशिव-तुळजापूर या पहिल्या टप्प्यात आठ किलोमीटर अंतराचं काम वेगात सुरू आहे. या मार्गावर लहान-मोठे एकूण ५० पूल असणार आहेत. त्यापैकी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल साकारला जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

****